# १८ कोटी बुडविणाऱ्या मुंबई मॅरेथॉनवाल्यांचे लाड केले

# अन् एक बिल थकले तर आमची कॉलर पकडता?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**

'मुंबई मॅरेथॉन' ही श्रीमंत आयोजकांची मॅरेथॉन पार पडली. या मॅरेथॉनच्या बक्षिसाची रक्कम इतकी भरमसाठ आहे की याची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर होते आणि या मॅरेथॉनसाठी जगभरातील धावपटू येतात. ४ लाख ५ हजार डॉलर इतकी भलीमोठी बक्षिसाची रक्कम आहे. अशी मॅरेथॉन मुंबईत होणे ही निश्चितच गौरवास्पद बाब आहे. पण हा गौरव मानत असताना मॅरेथॉनचे आयोजक मुंबई पालिकेला दरवर्षी वेठीस धरतात याचा जाब का विचारला जात नाही? मुंबई पालिकेची जबाबदारी असलेले रस्ते, फुटपाथ, शौचालयं, मैदाने सर्वकाही वापरायचे, मुंबई पोलिसांना २४ तास संरक्षणासाठी रस्त्यावर उभे करायचे, तीन मोठ्या रस्त्यांवरील वाहतूक पूर्ण फिरवायची ही सर्व मदत घेऊन दरवर्षी त्याचा मोबदला चुकता करायचा नाही अशी मॅरेथॉन आयोजकांची पद्धत झाली आहे. दुर्दैवाने मोठा कार्यक्रम आणि मोठी नावे यापुढे सरकार झुकते आणि पालिकाही झुकते. दरवर्षी हाच तमाशा चालतो. मग प्रश्न असा आहे की, इमानाने प्रत्येक शुल्क आणि प्रत्येक कर भरणाऱ्या सामान्यांना कधीही अशी सवलत का दिली जात नाही? एखाद्याने वीजेचे बिल भरले नाही तर ताडकन त्याची वीज कापली जाते. एखादा कर भरला नाही तर त्याला नोटीसावर नोटीसा पाठविल्या जातात. त्याच्या दारावर नोटीसा लावून जगापुढे त्याला गुन्हेगार ठरवायला अधिकारी मागेपुढे बघत नाहीत. गुन्हेगारातही आता गरीब गुन्हेगार आणि श्रीमंत गुन्हेगार अशी पातळी निर्माण झाली आहे. म्हणजे गरीब गुन्हेगाराला तुंबलेल्या संडासाच्या कोठडीत शंभर जणांबरोबर कोंबून थंड फरशीवर झोपवतात आणि जो बँकेचे अब्जावधी रुपये बुडवून परदेशात पळतो त्याच्यासाठी आॅर्थर रोड जेलमध्ये हवेशीर कोठडी विशेष तयार केली जाते.

मॅरेथॉनच्या आयोजकांनी गेल्या तीन वर्षांत पालिकेचे १८ कोटी दिलेले नाहीत, मग मॅरेथॉनला परवानगी कशी दिली जाते? मॅरेथॉनला अशी बेकायदेशीर वागून परवानगी मिळत असेल तर मग आमच्या गणेशोत्सवात बाप्पाच्या मंडळांनी थोडी कुचराई केली तरी त्यांच्या मंडपाचा बांबू कोणत्या हक्काने उखडून टाकले जातात? जे हात बांबू उखडत होते ते हात स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक, टाटा, अंबानी ही नांवे बघून गर्भगळीत कसे होतात?

'मुंबई मॅरेथॉन'चे आयोजक जाहिरातींच्या माध्यमातून एका दिवसातच १० ते १५ कोटी रुपये सहजी कमवतात. पण या मॅरेथॉनसाठी ज्या मुंबई पालिकेची मैदाने, रस्ते, स्वच्छतागृह वापरतात त्यापोटीचे शुल्क मात्र भरत नाहीत. दरवर्षी हा वाद न्यायालयापर्यंत पोचतो. परंतु हा कार्यक्रम मोठा असून त्याचा फार गाजावाजा असल्याने शुल्क थकबाकीपोटी कार्यक्रमाला परवानगी नाकारायची हे पाऊल पालिका उचलत नाही. याचाच फायदा घेऊन दरवर्षी पालिकेचे काही कोटी रुपये थकवून बिनधास्तपणे मॅरेथॉन घेतली जाते. पालिकेने थकीत रक्कमेपोटी नोटीस पाठविली की ती रक्कम अधिक असल्याचा दावा करीत आयोजक न्यायालयात जातात. गेल्या वर्षी हाच प्रकार झाला.




पालिकेची रक्कम थकीत असल्याने मॅरेथॉनला परवानगी देता येणार नाही अशा पालिकेने नोटिसा पाठवल्या. यामुळे थकीत रक्कमेपैकी थोडी रक्कम पालिकेला मिळाली. पण आयोजकांनी पूर्ण देणी दिलीच नाही. तरीही पालिकेने शेवटी परवानगी दिली. आम्ही नाक दाबून थोडी थकबाकी तरी वसूल केली अशी फुकट मिजास पालिका अधिकारी मारत होते. अशा मिजाशीची त्यांना लाजही वाटली नाही. गेल्या तीन वर्षांत मॅरेथॉन आयोजकांनी १८ कोटी रुपये थकवले आहेत. त्यावरील तीन वर्षांचे व्याज बुडवले आहे. एकीकडे ४ लाख ५ हजार डॉलर रुपयांची बक्षिसाची खैरात करून आपली मॅरेथॉन ही आशियातील सर्वात मोठी मॅरेथॉन आहे म्हणून मिरवायचे आणि दुसरीकडे पालिकेचे १८ कोटी थकवण्याची चिंधीचोरी करायची. तरीही या आयोजकांचा सन्मान करायचा? मुख्यमंत्र्यांपासून सर्व मंत्र्यांनी मॅरेथॉनला पहाटे उठून हजेरी लावत हिरवे झेंडे दाखवायचे? कष्टाच्या कमाईतून न चुकता कर भरणाऱ्या एखाद्याचा असा सत्कार करावा हे कधी सूचत नाही ना? या मॅरेथॉनमध्ये मुंबईच्या झोपडीतला गरीब आणि चाळीतील मध्यमवर्गीय दिसतच नाही. उद्योग, बँक किंवा एनजीओशी संबंधित असलात तर त्यांच्या नावाचे टी शर्ट घालून सहभागी व्हायचे इतकीच सामान्य माणसाला मुभा असते. जे मॅरेथॉनमध्ये सहभागी होतात ते धावून परत जातात तेव्हा त्यांच्या मार्गावरील प्रत्येक रस्त्यावर पाण्याच्या बाटल्या आणि कागदी ग्लासचा खच पडलेला असतो. हा उकीरडा कोण साफ करणार? मॅरेथॉनमध्ये धावणारे 'सजग नागरिक' घरी जाऊन झोपतात आणि ज्या पालिकेचे पैसे बुडवले त्या पालिकेचे सफाई कर्मचारी रस्ते साफ करतात. त्यांचे धन्यवाद हे आयोजक मानत नाहीत, त्यांचा फोटो कधी टाकत नाहीत.

'दाग अच्छे है' म्हणत स्वत:चे उत्पादन विकण्याची मानसिकता असलेल्यांपैकी हे मॅरेथॉनचे आयोजक आहेत. त्यांच्याकडून पुढच्या वर्षी तरी संपूर्ण थकबाकी वसूल करण्याची हिंमत दाखवा नाहीतर कार्यक्रम बंद पाडा. श्रीमंताला आणि गरीबाला वेगळी वागणूक देण्याचा हक्क संविधानाने दिलेला नाही. आमचे रस्ते, आमचे फुटपाथ, आमची मैदानं, आमचे कर्मचारी, आमचे पोलीस, आमचे संडास वापरायचे असतील तर शुल्क भरा हे मॅरेथॉनवाल्यांना ठणकावून सांगा.